ISSN 2229-6190
RNI. MAHMUL02937/2010/35848
International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# SOCIAL GROWTH

CHIEF EDITOR
DR. BALAJI KAMBLE

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35 ISSN 2229-619
SOCIAL GROWTH Issue : XIV, Vol. I, May 2017 To Oct. 201

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | An Analysis of Sex Ratio in Udgir Tahsil | Rekha Balaji Patil | 1 |
| 2 | A Citation Analysis Study of Doctoral Dissertations in Botany Submitted to the Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | Vilas Bhaurao Pawar, Dr. Govind S. Ghogare | 8 |
| 3 | Dronacharya S. Joginder Singh Saini Eminent Coach as well as Teacher - A Case Study | Dr. Chamkaur Singh | 18 |
| 4 | महाराष्ट्राच्या महसूली जमेतील अलिकडील काळातील प्रवृतीचा अभ्यास | मनिषा आसाराम गोरे | 29 |
| 5 | जलसंवर्धन काळाची गरज | डॉ. एच. डी. वागलगावे | 34 |
| 6 | खो-खो महिला खेळाडुंना स्पर्धे दरम्यान येणाऱ्या नैसगिक समस्या एक अभ्यास | डॉ. आप्पासाहेब हुंब्बे | 38 |
| 7 | महाराष्ट्र राज्य सामाजिक न्याय विभागातील अपंग कल्याण योजनांचा एक अभ्यास | केशर जी. राठोड | 43 |
| 8 | छत्तीसगड राज्यातील शांतीमार्च मोहिमेची प्रासंगिकता | रावसाहेब एस. कांबळे | 50 |

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XIV, Vol. I, May 2017 To Oct. 2017 

6

# खो-खो महिला खेळाडुंना स्पर्धे दरम्यान येणाऱ्या नैसगिक समस्या एक अभ्यास

**डॉ. आप्पासाहेब हुंब्रे**
क्रिडा विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय,
भूम, जि. उस्मानाबाद

*Research Paper - Physical Education*

**सारांश**

*प्रस्तुत अध्ययनात मंडळातील महिला खो-खो खेळाडुंना स्पर्धेदरम्यान कोणकोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो या साठी नागपूर शहारातील ३५ महिला खेळाडुंची सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली. त्यामध्ये १५ ते २५ वर्ष वयोगटातील खेळाडु निवडण्यात आले. राष्ट्रीय, राज्य, विद्यापीठ, महाविदयालयीन तसेच विभागीय स्पर्धेतील महिला खेळाडूंचा संशोधनात समावेश करण्यात आला. संशोधनाचे क्षेत्र हे बीड शहरातील खो-खो क्रिडा मंडळे असून ३५ खेळाडूंपर्यंत मर्यादित होते. या संशोधन कार्यात निर्दोष माहिती मिळण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला आणि 'संरचित' प्रश्नावली तयार करुन प्रत्यक्ष भेटून माहिती मिळविण्यात आली. माहितीचे सांख्यिकिय विश्लेषण करण्यात आले.*

**प्रस्तावना**

स्त्रीच्या खेळाकडे पाहता त्यात सामाजिक व नैसर्गिक मर्यादा प्रामूख्याने दिसून येतात निसर्गाने स्त्रीला बहाल केलेले सृजनत्व आणि त्यामुळे येणारा धर्म या गोष्टी प्रमुख अडथळा मानण्यात येतात.

खेळ खेळत असताना किंवा सरावादरम्यान जर तिला मासिक धर्म आला असेल तर शारिरीक अडचणींचा सामना करावा लागतो.अश्या अवस्थेत खेळणे म्हणजे स्त्रीच्या स्वास्थावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. अश्या परिस्थितीमध्ये ये कूंटूबाकडुन देखिल परिणाम झाल्याने

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O'bad

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XIV, Vol. I, May 2017 To Oct. 2017 

दिसून येते.

त्याच बरोबर स्त्री जर कौटूंबिक जबाबदारी पार पाडत असेल तर ती जबाबदारी सांभाळता ती खेळामध्ये सहभागी होतांना तीला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. सरावादरम्यान त्याच बरोबर काही वेळा प्रत्यक्ष स्पर्धेदरम्यान नैसर्गिक समस्या आली त्यावेळी तिला मनमोकळेपणाने इतरांसोबत संवाद साधता येत नाही त्याच्या परिणाम तिच्या खेळावर देखील होतो.

खो-खो हा खेळ अतिप्राचीन असा आपल्या संस्कृतीशी निगडित असा खेळ- आहे. खे-खो हा खेळ अगदी महाभारताच्या काळापासुन खेळण्यात येत होता पण त्याच वेळी त्याचे स्वरूप वेगवेगळया प्रकारचे होते.

खे-खो हा भारतीय खेळ आहे. खो-खो हा खेळ संपूर्ण भारतामध्ये खेळल्या जातो. या खेळाची सुरुवात महाराष्ट्रात पूणे येथे झाली. पूणे जिमखाना या संस्थेने या खेळाला सुरुवात केली. खो- खो ची पहिली राष्ट्रीय खो-खो स्पर्धा आंध्रप्रदेशामध्ये विजयवाडा येथे सन १९६० मध्ये आयोजित करण्यात आली.

पहिली आशियाई खो-खो स्पर्धा १९९६ ला कलकत्ता येथे घेण्यात आली.

**समस्या कथन**

खो-खो महिला खेळाडुंना स्पर्धेदरम्यान येणाऱ्या नैसर्गिक समस्या एक अभ्यास.

**समस्येचा उदेष**

महिला खेळाडुंना स्पर्धेदरम्यान येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

**समस्येचे महत्व**

महिला खेळाडुंच्या समस्यांचा अभ्यास प्रस्तुत अध्यपनात झाल्यामूळे येणाऱ्या समस्य सोडविण्यासाठी प्रस्तुत अध्ययानेचे महत्व आहे.

**गृहतके**

क्रिडा मंडळातील महिला प्रशिक्षकांच्या अभावामूळे खो-खो खेळातील महिला खेळाडुंच सहभाग कमी आहे.

**संशोधन कार्य पध्दती**

या संशोधन कार्यात बीड शहरातील खों-खो क्रिडा मंडळातील माहिती शाधकर्त्यात आवश्यक होती म्हणून त्याने आपल्या संशोधनाकरीता प्रश्नावली व साक्षात्कार पध्दतीची निव केली. संशोधनाची व्याप्ती बीड शहरातील क्रिडा मंडळापर्यतच मर्यादित होती यासाठी क्रिडा मंडळाती महिला खेळाडूकडून माहिती मिळविण्यात आली महिलनांना येणा-या समस्येचे अध्ययन करण्य आले.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XIV, Vol. I, May 2017 To Oct. 2017



संशोधनाचे क्षेत्र हे बीड शहरातील खो-खो क्रिडा मंडळे असून ३५ खेळाडुपर्यंत मर्यादित होते. या संशोधन कार्यात निर्दोष माहिती मिळण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला आणि 'सहेतूक' नमुना निवड पध्दतीने 'संरचित' प्रश्नावली तयार करून भेटून माहिती मिळविण्यात आली. माहितीचे सांख्यिकिय विश्लेषण करण्यात आले.

माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण खालील प्रमाणे

**सारणी**

**१. स्पर्धा स्थळी प्रशिक्षक असतात का**

| प्रतिक्रिया | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 29 | 82.86 : |
| नाही | 6 | 17.14 : |
| नाही | 35 | 100.00 : |





वरील सारणीमध्ये स्पर्धेच्यावेळी प्रशिक्षक असतात असे म्हणणारे उत्तरदाते ८२.८६ : खेळाडुंचे म्हणणे आहे तर उत्तरदाते १७.१४ : खेळाडुंनी आपल्या सोबत प्रशिक्षक नसतात अशी प्रतिक्रिया नोंदवली आहे.

**२. स्पर्धेच्यावेळी महिला व्यवस्थापक असतात**

**सारणी क्र.२**

| प्रतिक्रिया | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 18 | 51.45 : |
| नाही | 17 | 48.55 : |
| एकुण | 35 | 100.00 : |




वरिल सारणीमध्ये स्पर्धेवेळी महिला व्यवस्थापक असतात असे म्हणणारे उत्तरदाते ५१.४५ : महिला खेळाडुंचे म्हणणे आहे तर उत्तरदाते ४८.५५ : खेळाडुंचे म्हणणे आहे कि त्याच्या बरोबर महिला व्यवस्थापक स्पर्धेस्थळी नसतात.


S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6
Issue : XIV, Vol. I, May 2017 To Oct. 2

**३.स्पर्धा किंवा सरावाच्या वेळी नैसर्गिक समस्येच्या खेळावर होणारा परिणाम.**

**सारणी क्र ३ मध्ये**

| प्रतिक्रिया | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 32 | 91.43 : |
| नाही | 03 | 8.57 : |
| एकुण | 35 | 100.00 : |





नैसर्गिक समस्या स्पर्धेदरम्यान किंवा सरावाच्या वेळी आल्यास त्याचा परिणाम दिसून येतो असे मत ७४.२९ : खेळाडुंचे म्हणणे आहे. म्हणजेच २५.७९ : खेळाडुंचे म्हणणे स्पर्धा किंवा सरावाच्या वेळी नैसर्गिक समस्येचा खेळावर परिणाम होत नाही. यावरुन असे ल कि नैसर्गिक समस्येचा खेळावर परिणाम होतो.

**४. महिला प्रशिक्षक किंवा व्यवस्थापक सोबत नसल्यास खेळाडूंची होणारी कुचबंणा.**

**सारणी क्र.४ मध्ये**

| प्रतिक्रिया | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 32 | 91.43 : |
| नाही | 03 | 8.57 : |
| एकुण | 35 | 100.00 : |




महिला प्रशिक्षक किवा व्यवस्थापक सोबत नसल्यास नैसर्गिक समस्या आल्या संदर्भात सांगतांना जास्तीत जास्त महिला ९१.४३ : खेळाडुंची कुंचबणा होते तर ८.५७ : खे कुचंबणा होत नाही या विषयावर इतराशी मनमोकळेपणाने बोलू शकत नाही त्यांची या विषयावर होतांना दिसते.निष्कष खो-खो हा भारतीय खेळ आहे. या खेळासाठी शारिरीक क्षमता व आवश्यक आहे आणि त्याचे दिवसेंदिवस महत्व कमी होत आहे. या सोबतच महिला खे स्पर्धेतील सहभ्ांग कमी होतांना दिसत आहे म्हणूनच संशोधकाने ही गोष्ट लक्षात घेऊन त्याची शोधून काढण्यासाठी खेळाडूंची वैयक्तिक माहिती जाणुन घेतील व माहिती संकलीत केली

१. प्रशिक्षक असतात पण व्यवस्थापक कोणत्याही संघासोबत राहत नाही.

२. खेळत असतांना व स्पर्धेदरम्यान नैसर्गिक समस्या आल्यास त्याचा खेळावर परिणा झाल्याचे दिसून आहे आहे.

S.P.Mahavidyalaya,Bhoom Bhoom Tq.Bhoom Dist.O.bad

३. संघासोबत महिला व्यवस्थापक नसल्यामुळे विषयावर इतराशी बोलताना खेळाडुंची कुचंबणा होतांना आढळून आहे आहे.

**शिफारसी**

१. मंडळाने सरावादरम्यान तसेच स्पर्धेदरम्यान महिला व्यवस्थापक सोबत ठेवावा.

२. महिलांना सर्वसाधारण सामाजिक बंधने कौटूंबिक वातावरण, चालीरीती हयाची भीती वाटते हयाकरीता क्रिडेचे महत्व कळावे म्हणुन खेळाविषयी व्याखान, परिसंवाद, खेळाडूंचे सत्कार हयासारखे कार्यक्रम अधून मधून आयोजित करावे.

## संदर्भ सूची :-

१. डॉ. साठे वसंत - 'खो-खो तंत्र आणि मंत्र' प्रकाशन महाराष्ट्र संघ, १६५ शुक्रवार पेठ पूणे.

२. हल देवेंद्रसिंह - 'शारिरीक शिक्षा तत्व एवं इतिहास व समरत्त खेल मैदान एवंम नियम' दिल्ली फ्रेंडस पब्लिकेशन १९७७.

३. मल्होत्रा अशोक तथा तराल चंद्रकांत - 'भारतीय खेल प्रशिक्षण'

## लेखकांसाठी महत्त्वाच्या सुचना

१) आपले मौलिक शोधनिबंध ते आम्ही सुचविलेल्याच नमुन्यामध्ये टायपिंग करून, त्याची एक प्रिंट कॉपी व एक सी. डी. फॉर्म सोबत द्यावी किंवा ई-मेलवर पाठवावी.

२) मराठी व हिन्दी भाषेसाठी **DVB-TTYogesh (Font size - 14)** चा वापर करावा.

३) इंग्रजी भाषेसाठी **Times New Roman (Font size - 12)** चा वापर करावा.

४) शोध निबंध हे सारांश आराखडा (Abstracts), Key words, Introduction, Objectives, Central Idea, Conclusion, Suggestion, Summery & References या प्रमाणे असावेत. आवश्यकतेनुसार नकाशे, टेबल व आलेखांचा वापर करावा.

५) आदर्श संदर्भ सूची ही पुढीलप्रमाणे असावी -
Authors Name, Edition (in Bracket), Book Name, Publication, Vol. No. Page No. या स्वरूपात असावी.

६) **शोधनिबंधासोबत आपला शिकवित असलेल्या विषयाचे नाव, विभागाचे नाव, महाविद्यालयाचा पूर्ण पत्ता, घरचा पूर्ण पत्ता, पिन कोड, फोन, मोबाईल, ई- मेल द्यावा ही विनंती**

वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करून संपादक मंडळाला सहकार्य करावे, ही विनंती.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O'bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad